REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# सहकारी साखर कारखान्यातील राजकारणाचे मराठी कादंबरीतील चित्रण



प्रा. डॉ. पंढरीनाथ धोंडगे[1] , प्रा. विनायक जाधव[2]
[1] डी. एस. एम. महाविद्यालय जिंतूर .
[2] के.के.एम. महाविद्यालय मानवत.

## प्रस्तावना :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात ग्रामीण जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकारी चळवळीच्या माध्यमातून कृषीऔद्योगिकरणाला चालना देण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झाले. विशेषतः संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर सहकारी साखर कारखानदारीला प्रोत्साहन देण्यात आले. या कारखाने उभारणीत स्वातंत्र्यसैनिक, केंद्रीयमंत्री, मुख्यमंत्री, राज्यांचे मंत्री, राज्य सहकारी बॅंकेचे अध्यक्ष, खासदार, आमदार, जि.प.अध्यक्ष, जि.म.बॅंकेचे अध्यक्ष, पं.स. सभापती आदी राजकीय मंडळींचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी आपआपल्या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, आपले राजकीय साम्राज्य वाढविण्यासाठी व ते टिकविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांची उभारणी केली. या कारखान्याची उभारणी करताना, ते चालवताना त्यांच्यात अनेकदा एकमेकाविरुध्द राजकीय संघर्ष निर्माण होतात. यातून कारखान्याच्या मान्यतेचे, पायाभरणीचे, बॉयलर प्रतीपादन सोहळा व गळीत हंगामाचा शुभारंभ यात राजकारण होताना दिसते. या गटागटाच्या राजकारणातून राजकीय सुडाची भावना निर्माण होते. राजकीय सुड उगविण्यासाठी राजकीय डावपेचाची आखणी केली जाते. राजकीय तडजोडी करुन निवडणुका लढविल्या जातात. सत्ताधारी लोकांना विरोधक वार्षिक सर्वसाधारण सभेत कोंडीत पकडण्याचे राजकारण करतात. ''1 जुन 1984 रोजी रविंद्र दप्तरदार यांची 'साखरपेरणी' नावाची कादंबरी प्रकाशित झाली. प्रस्तुत कादंबरीतून परिसराचे जीवन पालटून टाकणारे साखर कारखाने राजकारणी लोकांचे सत्तेचे अड्डे बनले आहेत, हा विचार मांडला आहे''[1]कारखान्याचे राजकीय महत्व ओळखून आमदार पासुन पंतप्रधानापर्यंत राजकीय लोक दखल घेताना दिसतात. या सर्वांचा शोध सहकारी साखर कारखान्याशी संबंधित लिहिलेल्या मराठी कादंबरीच्या आधारे या शोधनिबंधात घ्यावयाचा आहे.

सहकारी साखर कारखान्याची उभारणी करताना केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांची मान्यता, अर्थसहाय्य मिळविण्यासाठी राजकीय संबंधाचा वापर करावा लागतो. संस्थापक आपले राजकीय कौशल्ये वापरुन कारखान्यांची उभारणी करतात. त्याचवेळी त्यांचे राजकीय विरोधक मान्यता मिळु नये यासाठी राजकारण करतात. ''ज्यांना आजवर आम्ही आपले नेते मानीत होते तेच आज आमच्या भागात साखर कारखाना होऊ नये म्हणून कारवाया करीत आहेत. पण त्यांच्या विरोधाला भीक न घालता आमचा साखर कारखाना उभारुन दाखविल्याशिवाय आता आम्ही गप्प बसणार नाही''[2]विरोध असुनही वरिष्टांच्या सहकार्याने मान्यता मिळवतात. त्यांच्याकडे आपले राजकीय वजन अबाधित ठेवण्यासाठी त्यांना कारखान्याच्या पायाभरणीला, बॉयलर प्रतिपादन सोहळ्याला व गळीत हंगामाच्या शुभारंभाला उद्घाटक, प्रमुख पाहुणे म्हणून बोलवितात.''आकारामबापूंच्या साखर कारखान्याचे आज उद्घाटन पहिला गळीत हंगाम जसवंतराव प्रमुख पाहुणे. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री''[3]

कारखाना उभारणीत ज्यांनी सहकार्य केले. त्या राजकीय नेत्यांचे कार्य जनतेसमोर मांडणे. त्यांच्या राजकीय लोकप्रियतेत भर घालणे. आपल्या विरोधकांवर राजकीय कुरघोडी करणे. आपल्या परिसरात राजकीय सामर्थ्यांचे प्रदर्शन करणे. राज्य, राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तींकडून आपली स्तुती करुन घेणे हे राजकीय हेतू यापाठी मागे असतात. या कार्यक्रमांतुन चेअरमनचे विरोधक त्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न करतात.''होय साहेब, तुम्ही जरा कारखान्यावर येऊन तुमच्या खास शैलीत जरा झोडपा तिला. लोकांना वाटलं पाहिजे, जनरल बॉडीतला गोंधळ उगीच नव्हता. श्रेष्ठी रागावलेले आहेत. बाईनं खरंच चांगलाच हात मारला असणार''[4]

कारखान्यातील गटबाजी अशा कार्यक्रमातुन दिसुन येते. आपल्या गटाचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी कारखान्याच्या क्षेत्रात घडलेली कोणतीही चांगली गोष्ट माझ्यामुळेच घडली असे जनतेवर बिंबवण्याचा प्रयत्न या विविध गटाकडुन होतो. या गटबाजीला राज्य, राष्ट्रीय पातळीवरुनही खतपाणी घातले जाते. आपल्या समर्थकांची संख्या वाढवून आपले राजकीय वर्चस्व वाढविण्याचा प्रयत्न यातून होतो.राजकीय वर्चस्वातुन परस्पर सुडाची भावना निर्माण होते. माझी पोळी भाजत नसेल तर मी विरोधकांची का भाजू देऊ? अशी वृत्ती निर्माण होते. हि वृत्ती राजकीय सत्तेसाठी वैयक्तीक चारीत्र्यपर्यंत जाताना दिसते.''बंधु–भगिनींनो चारीत्र्य गमावलेल्या या बाईनं माझ्या प्रिय मित्राच्या मुलीनं कारखान्याचा रंगमहाल करु नये असे मला वाटत.''[5]वैयक्तिक बदनामी केली जाते. यासाठी राजकीय डावपेच आखले जातात. विरोधकांचे नामोहरण केले जाते. त्यांना अपमानित करण्याचा प्रयत्न केला जातो. आर्थिक कोंडीत पकडून त्यांना त्रास दिला जातो.''विचारे चेअरमनला फोन करा आणि पंताला कर्ज मंजुर करायला सांगून पध्दतशीर हप्ते थकवा म्हणावं''[6]

सहकारी साखरकारखान्याची सत्ता आपल्या ताब्यात घेण्यासाठी, असलेली ताब्यात ठेवण्यासाठी वेळप्रसंगी विरोधकांसोबत ही राजकीय तडजोडी केल्या जातात. या तडजोडी विविध गटागटात, विविध राजकीय पक्षात 'स्व' स्वार्थासाठी होतात. यात तत्वांना, नितिमत्तेला तिलांजली देण्यात येते.''''खुर्चीसाठी जीभाउंशी मोहतुर लावल. डांवं पॅनेल उजवं बनलं''[7]सत्तालोभी संचालक सत्तेची फळे चाखण्यासाठी सत्ताधारीपक्षात सामील होतात. कालांतराने सुर्यभान यादवांच्या विरोधात वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक एकत्र येउन राजकीय तडजोड करतात.''कॉमरेड व देशमुखांनी कार्यकर्त्यांचा मेळावा भरवीला. कृती समितीची स्थापना व उमेदवारांची निवड झाली. 'कारखाना बचाव पनेल' या नावानं निवडणूक लढविण्याचं ठरविलं''[8] नव्यानं संधी देणे हे सहकाराचे आद्य तत्व आहे. या तत्वाला मुरड घातली जाते. राजकीय महत्वाकांक्षापोटी नव्यांना डावळुन सत्ता उपभोगण्यासाठी राजकीय तडजोडी करुन कारखान्याची सत्ता आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

सत्ता मिळविण्यासाठी कारखान्यात व्यक्तीकेंद्रीत पॅनेल उभे केले जातात. या पॅनेलमध्ये राजकीय पक्षापेक्षा व्यक्तीला महत्व असते. पॅनलप्रमुख हा आपल्या समर्थकांना पॅनेलमध्ये स्थान देतो. एकाच राजकीय पक्षाचे दोन पॅनेल असू शकतात. अनेक राजकीय पक्षांचा एक पॅनलही असू शकतो.''आकारामबापुंच्या साखर कारखान्यात त्यांच्या पॅनेलविरुध्द आबासाहेबांच्या गटाचं पॅनेल जाहीर झालं.''[9] या पॅनेलमधून निवडुन येणारे संचालक सत्तेसाठी पैश्यासाठी वाटेल ते करतात. सत्तेच्या लालसेने पॅनल प्रमुख चेअरमन यांच्या विरोधात बंड करतात. यासाठी विरोधी गटाला जाऊन मिळतात.''निवडणुकीच्या आधी आपल्याला पॅनेलमध्ये घ्यावं म्हणुन गोड गोड बोलणारी माणसं, संचालकझाल्याबरोबर निराळंच वागायला लागली होती.'' [10]संचालक झाल्यावर साधे भोळे असलेले ही आपले रंग दाखवतात. सौदेबाजीतून चेअरमन ठरवतात. चेअरमनबरोबर पुणे, मुंबई फिरतात. कारखान्याच्या आर्थिक व्यवहारात सहभागी होउन चेअरमनच्या दलालीत दहावा हिस्सा मागतात. राजकारणातील अनेक गुण त्यांच्या अंगी येतात. तर काही संचालक हे संतप्रवृत्तीचे असतात. उदा. साखर कारखाना कादंबरीतील चिमनराव, आंबुशेट, सहकार सम्राट कादंबरीत 'होयबा' संचालक दिसतात.

सहकारी साखर कारखान्यात संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीला महत्व असते. हे संचालक उस उत्पादक सभासदातून व एक सोसायटी मतदार संघातून निवडले जातात. या निवडणुकामध्ये मतदारांना पैसे दिले जाता. त्यांना सहलीवर पाठविले जाते. सत्ताधारी पॅनेलवर विरोधक आरोप करतात. विरोधकांची कमजोर बाजू दोंन्हीकडुन व्यासपीठांवर मांडली जाते. कार्यकर्त्यांना पैसाचे, पदाचे आमिष दाखवून फोडले जातात''.''सत्ता मिळवायची तर तिथं ध्येय धोरणं, सिध्दांत, नितीमता खुंटीला टांगावी लागते. निवडणुकीत डोकी महत्वाची असतात. तुमच्या सारखे विचारी मेंदू नव्हे.''[11] या निवडणुकामध्ये सभासद शेतक–यांना महत्व येते. सोसायटी मतदार संघात मर्यादीत मतदार असल्याने सत्ताधारी पक्षाचा विजय होताना दिसतो. मात्र मध्ये घोडेबाजाराला अधिक ऊत येतो. सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकांपैशाशिवायही विकासाच्या मुद्यावरुन जिंकल्या जातात. त्या तेथील नेतृत्वाच्या कर्तृत्वावर जिंकल्या जातात. तो खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विजय होय.

लोकशाहीचे तत्व समाजमानसात रुजविण्यात सहकारी साखर कारखान्यांचे मोलाचे योगदान आहे. ''सहकार हा लोकशाहीचा मार्ग आहे–ते एक महान तत्व आहे–आणि या मार्गावरुन ज्यांनी जाण्याचे ठरविले आहे–त्यांची भूमिका सहाकार्याची हवी''[12]लोकशाही आणि सहकारात सहकार्याची भावना असते. या दोन्ही गोष्टी समाजवाद राबविण्यास पोषक आहेत. भारतात सर्वसामान्य माणांसाच्या विकासासाठी लोकशाही शासनव्यवस्थेचा स्विकार केला आहे. लोकशाहीद्वारे समाजवादी समाजरचना राबविण्यासाठी सहकारी क्षेत्राची मदत होते. सहकारात

सभासदांचा विकास साधला जातो. सहकारी कारखान्याच्या निर्णप्रक्रियेत लोकांचा सहभाग असतो. लोकांना केंद्रबिंदु मानून सहकारातून विकास साधला जातो.

सहकारी साखर कारखान्यात सभासद शेतक—यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केल्या जातात. या सभामध्ये गोंधळ घालणे सभा उडवून लावणे, सत्ताधा—यांना अडचणीत आणणे यापाठीमागे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील राजकारण असते.''साखर कारखान्याचा चेअरमन — चोरमन — चोरमन!''[13] गुंडांना हाताशी धरुन सभा यशस्वी किंवा अयशस्वी केल्या जातात. राजकीय पोळी भाजून घेतली जाते. या कारखान्यांची दखल राज्य, केंद्रीय पातळीवर नेते घेतात. याद्वारे आपला कार्येकर्तेचा संच उभा करतात. कारखान्याच्या चेअरमनशी राजकीय संबंध ठेवतात. आपल्या कार्यकर्त्याची राजकीय ताकद वाढविण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना परवानगी देतात. पंतप्रधानही यांची दखल घेतात.''महाराष्ट्र का मामला तो व्हेरी इंपॉर्टंट हाये. शुगर लॉबी के तरफ ध्यान देना चाहीये''[14]

सहकारी साखर कारखान्याचे इतर सहकारी संस्थेशी परस्परपुरक संबंध राखण्याची व्यवस्था महाराष्ट्रातील सहकारी कायद्यान्वये केली. यातूनच महाराष्ट्रात सहकारी संस्थेचे जाळे उभा राहिले. कालांतराने यात राजकारणाचा शिरकावा झाला. या संस्थेचा उपयोग परस्परपुरक राजकारणासाठी केला जाऊ लागला. ''सोसायटी मतदार संघातून एकाला निवडुन घ्यायचं होत. जीभाउ धुर्त त्यांनी आपल्या खास. मर्जीतल्या फक्त चौपन्न सोसायट्यांना कारखान्याचं सभासदत्व दिलं होतं''[15] साखर कारखान्याच्या निवडणुकीत गावपातळीवरील शेतऱ्यांच्या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीकडे एक मतदान संस्था म्हणुन पाहिल्या जाउ लागले. एवढ्याच कामापुरते सोसायटीकडे पाहिले जाऊ लागले. जिल्हा मध्यवर्ती बंक ही सहकारी साखर कारखान्याला वित्तपुरवठा करणारी महत्वाची संस्था आहे. कारखान्यांच्या कर्जरुपी वित्तपुरवठा करताना बॅकेचे चेअरमन त्याकडे राजकीय चष्म्यातुन पाहतात. कारखान्याच्या संचालक मंडळावर आपल्या कायकर्तेची वर्णी लावून कारखाना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करतात. तसेच राजकीय विरोधकांना आर्थिक मदत मिळू देत नाहीत.''आडके, मी तसं म्हणू शकतोच शेवटी वरदेश्वराला उस कर्ज मिळू दयायचं की नाही, हे माझ्या हातात आहे. मी मालक आहे बॅकेचा''[16]

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व आमदार बहुतांश एकच व्यक्ती असल्याचे दिसते. आमदार आपले राजकीय वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी साखर कारखाने उभारतात. काही कारखान्याचे चेअरमन आमदार होतात. कारखान्याचा उपयोग आमदार होण्यासाठी करतात.''आपल्या विधासभेच्या निवडणुका आता फार लांब आहेत, असं वाटत नाही. या निवडणुकांच्याही वातावरणाची आणि उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी दिल्ली आणि मुंबईहुन पक्षाचे निरीक्षक येणार आहेत, तर त्यांनाच कार्यक्रमासाठी बोलवावं असं मला वाटतं''[17]ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था व कारखाने यांच्यात राजकीय संबंध येत असतो.''जिल्हा परिषदेच्या व पंचायत समित्यांचया निवडणुकांमुळे आधीच विस्कळीत झालेलं धनेश्वर सहकारी साखर कारखान्याचं बेळापत्रक आणखी विस्कळीत झाल.''[18] ग्रामजीवनात पंचायत समिती जिल्हा पषिद या स्थानिक स्वराज्य संस्थांना खुप महत्व असते. या निवडणुकात विजय संपादन करण्यासाठी कारखान्यातील सत्ताधारी मंडळी आपल्या सत्तेचा वापर करतात. आपला उमेदवार उभ्या असलेलया गणातील, गटातील ऊस गाळपासाठी कारखान्याला घेवुन जातात.

## समारोपः

सहकारी साखर कारखानदारीत पावलोपावली राजकारणाचा अनुभव येतो. येथील प्रत्येक निर्णयातून राजकीय लाभ उठविण्याचा प्रयत्न केला जातो. या क्षेत्रातील सर्व घटनाप्रसंगाकडे राजकीय दृष्टीकोणातुनच पाहिले जाते.

## निष्कर्षः

1. सहकारी साखर कारखान्याची मान्यता हि राजकीय संबंधाद्वारे मिळते.
2. सहकारी साखर कारखान्यातील कार्यक्रमाद्वारे राजकीय फायदा उठविण्याचा प्रयत्न केला जातो.
3. सहकारी साखर कारखान्यात गटबाजी असते. तिला वरिष्ठ पातळीवरुन जाणीपुर्वक खतपाणी घातले जाते.
4. या क्षेत्रात राजकीय सुडातुन वैयक्तीक चारित्र्यांचे भांडवल केले जाते.
5. स्वार्थासाठी तत्वांना, नितिमत्तेला तिलांजली देऊन राजकीय तडजोडी केल्या जातात.

6. या निवडणुकीत व्यक्तीकेंद्रीत पॅनेलला महत्व.
7. संचालकात राजकीय नेत्यांचे गुण येतात.
8. सर्वसामान्य माणसापर्यंत लोकशाहीचे तत्व रुजविण्यात. सहकारी साखर कारखान्यांची मदत झाली.
9. वार्षिक सर्वसाधारण सभेतील गोंधळ राजकीय हेतुने प्रेरित असतो.
10. राज्य, केंद्रीय पातळीवरील नेतृत्व यात लक्ष घालताना दिसते.
11. स्थानिक स्वराज्य संस्था व विधानसभेसाठी कारखान्याचा उपयोग केला जाते.

## संदर्भः


1. डॉ. विभुते शंकर, स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती 2010 पृ. 969.
2. दप्तरदार रविंद्र, साखरपेरणी, ग्रंथाली वाचक चळवळ, मुंबई1984 पृ. 1
3. तत्रैव पृ. 90
4. जाधव तेजस्विनी, सम्राज्ञी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृती, 2008, पृ. 168
5. श्री. शेट्ये चंद्रकांत, चेअरमन, पृ 105
6. सेनावले अरविंद, सहकार सम्राट, योगेंद्र प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 1985 पृ. 105
7. पाटील टी. एस., साखरखाना, अक्षय प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती 2008 पृ. 60
8. तत्रैव पृ. 135
9. दप्तरदार रविंद्र, उ. नि. पृ 201
10. जाधव तेजस्विनी, उ.नि.पृ 30
11. पाटील टी. एस, उ.नि.पृ 132
12. सोनावले अरविंद, उ.नि.पृ 66
13. तत्रैव पृ. 129
14. दप्तरदार रविंद्र, उ.नि.पृ 65
15. पाटील टी. एस. उ.नि.पृ 580
16. जाधव तेजस्विनी उ.नि.पृ 63
17. तत्रैव पृ. 169
18. बोराडे रा.रं. रिक्त–अतिरिक्त, साकेत प्रकाशन औरंगाबाद पहिली आवृती 2009, पृ. 111


LBP PUBLICATION